# 'डीएसके बेनेली'च्या सुपरबाईक्स दाखल

## पुण्यात शोरूमचे उद्घाटन

**पुणे** : चालू आर्थिक वर्ष विचारात घेता सुपरबाईक्सची बाजारपेठ ९ हजार युनिटसची असून, पुढील वर्षी त्यात किमान २ हजार युनिटसची वाढ अपेक्षित आहे, असे डीएसके मोटोव्हील्स प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन शिरीष कुलकर्णी यांनी पत्रकारांना सांगितले. सध्या सुपरबाईक बाजारपेठेत चीन आघाडीवर असून, त्यांची वार्षिक विक्री २० हजार युनिटस्एवढी आहे; पण काही वर्षांत भारताची बाजारपेठ चीनला मागे टाकेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.



डीएसके बेनेली यांच्या पुण्यातील वाकडेवाडीजवळील शोरूमचे उद्घाटन गुढीपाडव्याला झाले. यावेळी (डावीकडून) जॉर्ज वँग, हेमंती कुलकर्णी, शिरीष कुलकर्णी आणि डीएस कुलकर्णी उपस्थित होते.

त्यांच्याकंपनीनेनामवंतइटालियन ब्रँड बेनेली समवेत सुपरबाईकच्या असेंब्ली वितरणात भागीदारी केली असून, या 'डीएसके बेनेली' ने पुण्यात शोरूम सुरू केली आहे. शिवाजीनगर परिसरातील वाकडेवाडी येथे जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत हे शोरूम आहे. या शोरूममध्ये डीएसके मोटोव्हील्सच्या डिलरशिप अंतर्गत भारतात उपलब्ध असलेल्या 'डीएसके बेनेली' सुपरबाईक्सची संपूर्ण रेंज देऊ करण्यात आली आहे. या शोरूमचे उद्घाटन आज पाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आले. यावेळी डीएसके उद्योग समुहाचे चेअरमन डी. एस. कुलकर्णी, हेमंती कुलकर्णी, शिरीष कुलकर्णी आदी उपस्थित होते. बेनेलीचे संचालक जॉर्ज वँग, ग्लोबल मार्केटींग मॅनेजर, टोंनी बुस्तोस, एरिया एक्सपोर्ट मॅनेजर डेव्हिड आणि प्रॉडक्शन टीमचे सदस्यही यावेळी उपस्थित होते.

'डीएसके बेनेली'च्या एकूण नऊ शहरांत शोरूम सुरू होत असून, त्यात हैदराबाद, मुंबई, बंगळुरू, गोवा, नागपूर, कोचीन आदींचा समावेश आहे.

पुण्याच्या शोरूममध्ये पुढील सुपरबाईक्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याच्या किंमतीही सोबत दिल्या आहेत.

टीएनटी ३०० एम (२ लाख ८६ हजार), टीएनटी ३०० पी (२ लाख ९५ हजार), टीएनटी ६०० आय (५ लाख २२ हजार), टीएनटी ६०० जीटी (५ लाख ७० हजार), टीएनटी ६०० जीटीएस (६ लाख ६ हजार), टीएनटी ८९९ (९ लाख ५९ हजार), टीएनटी आर (११ लाख ९५ हजार). ३०० सीसी पासून ११३१ सीसीपर्यंतच्या या बाईक्स असून, त्यांचे बुकिंग आणि डिलिव्हरीही सुरू आहे. पहिल्याच दिवशी २७ जणांनी बुकिंग केले असून, त्यापैकी १० जणांना आज चाव्या देण्यात आल्या.




डीएसके बेनेलीच्या मुंबई सुपरबाईक समवेत जॉर्ज वँग, शिरीष कुलकर्णी.

या बाईक्सची लोकप्रियता लक्षात घेता आगामी काळात रेसिंग स्कुल सुरू करण्याचा विचार असल्याचे शिरीष कुलकर्णी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पहिल्या वर्षात ३००० युनिटसच्या विक्रीचे उद्दिष्ट असून, २५० ते ६०० सीसी कॅटेगिरीला अधिक मागणी आहे, असेही ते म्हणाले. या प्रकल्पात एकूण २०० कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. ग्राहकांच्या वाढत्या आशा आणि उच्च जीवनशैलीची ओढ यामुळे सुपरबाईकची लोकप्रियता वाढत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जॉर्ज वँग म्हणाले की, अशिया पॅसिफीक विभागात भारत ही आमच्यासाठी मोठी बाजारपेठ आहे. त्यातही पुणे अधिक महत्त्वाचे राहणार आहे. वाहतूककोंडी होऊनही अपघात होत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. भारतीयांमध्ये हा 'सिक्स्थ सेन्स' अंगभूत असला पाहिजे हे यावरून लक्षात येते. डी. एस. कुलकर्णी आपल्या भाषणात म्हणाले की, डीएसके उद्योगसमुहाची वार्षिक उलाढाल ५ हजार कोटींच्या घरात असून, विविध क्षेत्रात आम्ही विस्तार केला आहे. ग्राहकांचे समाधान व विश्वासार्हता मिळविली की, यश अवघड नाही, हे आमच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

जागेचे मालक एच. सी. जहांगीर आणि बेनेलीचा अधिकारी वर्ग यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.